# निवांत



काशीताई नाटेकर

१९५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. नं. १४३३.

REFBK-0010049
REFBK-0010049

जगीं कोलाहल । मन भयाभीत ।
बैसावें निवांत । तरुतलीं ॥

# निवांत

REFBK-0010049

कवयित्री

काशीताई नाटेकर

[ ‘ गवाक्ष-गीत ’, ‘ आपुलकी ’, इ. काव्य-संग्रहांच्या कर्त्या ]

प्रस्तावना

ग. ल. ठोकळ

मूल्य : १॥ रु.

प्रकाशक :

र. बा. आंद्रे
लेखन वाचन भांडार
लक्ष्मी रोड, गणपती चौक
पुणें २.

* * *

* * *

मुद्रक :

सी. एस्. लाटकर,
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
२५२/५ अ, नारायण पेठ; पुणें २.

अनुक्रम २४०३६ दि: ३।७५
९९३३ नों: दि: २४।५।७५

# प्रस्तावना

महाराष्ट्रीय स्त्रीच्या भावना, विचार व कल्पना स्त्रियांच्या भाषेंत यथा-योग्य रीतीनें चित्रित करणाऱ्या कवयित्री म्हणून श्रीमती काशीताई नाटेकर वाचकांना चांगल्या परिचित आहेत. काव्याच्या प्रांगणांत पदार्पण करून त्यांना उणींपुरीं २६ वर्षें झालीं. '**गवाक्षगीत**' हा त्यांचा पहिला काव्य-संग्रह. या संग्रहानंतर सहा वर्षांनीं त्यांचा '**आपुलकी**' हा दुसरा काव्यसंग्रह पसिद्ध झाला. त्यानंतर दहा वर्षांनीं '**फुलांचा कुरकुला**' निघाला. या संग्रहांत हान मुलांसाठीं लिहिलेल्या कविता संकलित केलेल्या आहेत. आणि आतां उतारवयांत लिहिलेल्या कवितांचा '**निवान्त**' हा कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. कुणाला कविता लिहिण्याचा छंद असतो; कुणाला नाद असतो; तर कुणाला प्रतिभेचा झटका येतो व तो कालांतरानें नाहींसा होतो. काशीताईंची भूमिका निराळी आहे. काव्य हें त्यांचें उपास्य दैवत आहे. इतक्या सातत्यानें व भक्तिभावानें काव्याची उपासना करणारी कवयित्री अगदींच विरळा !

काशीताई स्वतःच्या भावनांशीं प्रतारणा करीत नाहींत. कुंपणावरून उड्या टाकण्याचा अवखळपणा त्यांच्या काव्यांत आढळत नाहीं. त्यांच्या काव्याचा स्थायीभाव कौटुंबिक आहे. हें पुस्तक वाचीत असतांना एखाद्या वाचकाला जर कवयित्रीची मूर्ति मनोमन उभी करावीशी वाटली, तर त्याला बाळबोध कुटुंबांतली एक सुशिक्षित, सुसंस्कृत व नागर स्त्री दिसेल.

**परतुनी निजगृहीं झणिं यावया ।**
**करितसे मुरुड-कानवल्यास या ॥**
**कर पुढें करिं तुझ्या दधि घालितें ।**
**विजयि हो, तुजला शुभ चिंतितें ॥**

(मुरुड-कानवला, पृ. २९)

**लज्जित झाली, हळूच वदली, ' सांगुं नये हं कुणा–**
**अणावा सुबक नवा पाळणा ! '**

( सांगु नये हं कुणा ! पृ. ३४ )

या ओळींवरून या संग्रहांतल्या काव्याचें कौटुंबिक स्वरूप लक्षांत यावें. ' **निवान्त** ' मधल्या कांहीं कविता सोज्वळ शृंगारानें नटलेल्या आहेत. या शृंगाराची खुमारी कांहीं औरच वाटते. ' सख्या सोनचाफ्या ' या या कवितेंतली नायिका चाफ्याला उद्देशून म्हणते,

**" तव छायेखालीं ' त्यांनीं मज पाहिली**
**देउनी सुमन तव हळू जवळ घेतली "**

उत्कंठित झालेली अभिसारिका प्रणयार्त होऊन —

**" याल घरीं तैं बसेन रुसुनी**
**बोलणार ना मुळींच हसुनी**
**छेः ! निष्ठुर ' हे ' किति तरी ! "**

असे लोभस उद्गार काढते. ' गडे असे मी ' व ' जेव्हां जाइन घरीं ' कविताहि अशाच साजुक शृंगारानें शोभविल्या आहेत.

शृंगाराचा हात धरून चालणाऱ्या वात्सल्यानें या संग्रहाचा बराच मोठा भाग व्यापलेला दिसतो. आणि तें साहजिकच नाहीं का ? काशीताईंना बोबड्या बोलाचें महत्त्व ब्रह्मनादाइतकें वाटतें. पहिल्या खेपेची पुत्रवती " आपला बाळ कुणासारखा झाला ? " हा प्रश्न प्रथम पतीला विचारते. या प्रश्नानें पतीलाच काय, पण वाचकालाहि गुदगुल्या होतात. ' नका पाहूं निरखुनी ' ' जीवित साफल्य ' व ' एकताच आलें ' या कविता या दृष्टीनें वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

कविता लिहिण्याची काशीताईंची दोन तपांची तपश्चर्या फळास आल्याचा प्रत्यय हा संग्रह वाचतांना वारंवार येतो. जिला आपण ' सफाई ' म्हणतों तिचा आढळ पानोपानीं होतो.

परी तुझ्याविण जीवित ओझें
कुठें विसावूं मस्तक माझें ?

या दोन ओळींत केवढा आशय व्यक्त झाला आहे ! रचना सुमधुर असून शब्दयोजना चपखल वाटते. ‘ निश्चयता ’, ‘ निराशता ’ असे कांहीं प्रमाद खटकतात, पण ते अगदीं क्वचित् !

‘ **निवान्त** ’ मधल्या बहुतेक कविता प्रसादपूर्ण, छोटेखानी व गेय चालीं-वर लिहिलेल्या आहेत. कांहीं कवितांना आकाशवाणीवर स्थान मिळालेलें दिसतें; पण सुगम संगीतासाठीं सुयोग्य कवितांच्या तुटवड्याची तक्रार करणाऱ्या आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांनीं हा संग्रह आपल्या हातालगत ठेवावा व याचा भरपूर उपयोग करून घ्यावा, अशी माझी शिफारस आहे.

सध्यांचे दिवस नवकाव्याचे आहेत. ‘ मोडी ’ काव्याचें पीक उदंड फोफावत आहे. ‘ निवान्त ’चा रुचिपालट रसिक वाचकांना निश्चितपणें आवडेल असा मला विश्वास वाटतो.

ता. १५-८-५८. —**ग. ल. ठोकळ**

# अनुक्रमणिका


१. सख्या सोनचाफ्या १
२. उत्कंठा २
३. ना मीन परी ३
४. माहेराच्या पांखरा ५
५. जेव्हां जाईन घरीं ६
६. निसर्गाचा प्रणय ८
७. नका पाहूं निरखोनी ९
८. " गडे असें मी " १०
९. तो क्षण ११
१०. पुरे ही रेशनची नोकरी १२
११. ब्रह्मानंद १४
१२. कुणासारखा १५
१३. बोल बाबडे १६
१४. चुकामूक १७
१५. जगाला काय तयाची क्षिति १८
१६. चित्त-चोरटे १९
१७. कां २०
१८. कां पडती तव मंद पाउलें २१
१९. प्रवासी २२
२०. शकुन २३
२१. उषा २४
२२. खरी तूंच मैत्रिण २५
२३. ' एकताच आलों ' २६
२४. भंगलेली प्रीति २७
२५. कुठें विसावूं २८
२६. मुरड-कानवला २९
२७. जीवित-साफल्य ३०
२८. यमुने-तीरीं ३१
२९. जिव्हास्त्र ३१
३०. क्षुद्र कीटका ३२
३१. ज्ञान-दीप ३३
३२. मृत वधू बनती ३३
३३. सागूं नये हं कुणा–! ३४
३४. निराशता मग सकळ पळाली ! ३५
३५. रंगीत पाळणा ३६
३६. न कळे कोठें गेली बाला ! ३७
३७. संताजी किल्लेदार ३८
३८. झोंप सुखें ३९
३९. अविट गोडी लेखनीं ४०
४०. झोंप येईना कशी–! ४१
४१. म्हणून लाजलीस का ! ४२
४२. अभंग ४३



माझे श्वशुर
ती. कै. **विष्णु सदाशिव नाटेकर**
( ऊर्फ आण्णासाहेब )
यांस **सादर अर्पण**



**कवयित्री**
**काशीताई नाटेकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५०३६ वि: ३/४
क्रमांक ९२३३ नों: दि: २५/७/

# १ सख्या सोनचाफ्या !

प्रभातकाळीं मंदमंदसा शीत वायु वाहतो
अंगणीं चाफा हा डोलतो ।
कनकाचीं जणुं फुलें विकसलीं बहर येत त्यावरी
पसरला गंध तयांचा दुरी ।
कुणी खेळती, कुणी हांसती, नाचति कलिका कुणी
पाहती हळुच कुणी लाजुनी ।
लाल केशरी अन् सोनेरी कोमल किरणें अहा !
फेकितो अरुण तयांवरि पहा ।
हलवुनि पानें 'ये ये' म्हणुनी काय कळविशी मला
सांग ! का पाहिलेंस 'त्यांजला' ? ।
लावियला तुज 'त्यांनीं' म्हणुनी ओढ तुझी रे मशीं
प्रिय अती प्राणाहुनि वाटशी ।
गुज गोष्ट हृदयिंची ऐक गड्या एकली ।
नव छायेमाजीं 'त्यांनीं' मज पाहिली ।
देउनी सुमन तव हळू जवळ घेतली ।
इथेंच जडली प्रीत आमुची नाहीं भाग्या मिती
वाटशी हितकर तूं सोबती ।

६–१–४१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १००४६
संदर्भ शाखा

* * *

## २ उत्कंठा

कां उभी अशी बावरी
पाहते वाट कुणाची तरी ? ॥ ध्रु० ॥
भृंगावलि जाशि सुमनावरती ।
तेंवि मुखावरि कुंतल उडती ।
पदर फडफडे वाऱ्यावरती ।
परि भान नसे अंतरीं । पाहते वाट० ॥ १ ॥
पुन्हा पुन्हा कां वांकुनि बघते ।
कुरुंगनयना कुणा शोधिते ।
मार्गावरती नजर रोखिते ।
ना शांति जिवा तिळभरी । पाहते वाट० ॥ २ ॥
एक्या जागीं पद ना ठरतें ।
लागे चाहुल क्षणांत हसते ।
दिसे न कोणी, निराश होते ।
मनिं खिन्न होय सुंदरी । पाहते वाट० ॥ ३ ॥
दावि राग परि मनांत प्रीति ।
भिन्न भाव मुखिं तिच्या विलसती ।
संध्यारागासम पालटती ।
त्या सुंदर वदनावरी । पाहते वाट० ॥ ४ ॥
म्हणे मनीं मग रुष्ट होउनी ।
“ याल घरीं तैं बसेन रुसुनी ।
बोलणार ना मुळींच हंसुनी ।
छेः ! निष्ठुर ‘ हे ’ किति तरी ” । पाहते वाट० ॥ ५ ॥

* * *

# ३ ना मीन परी–

सागरतीरीं धीवर-युवती वाळूवरि बैसली
झरझरा जाल विणूं लागली।
जल-लहरि तिजपुढें लीलेनें क्रीडती।
नाकळे कशाला पुढें पुढें धांवती।
जलदेवी मानुनि काय तिला वंदिती।
पाठशिवणिचा खेळ खेळती, धवल फेन त्यांवरी
नाचतो सान बालकापरी ॥ १ ॥

समिर मित्र ये, सहल कराया जलबिंदू उडवुनी
टाकितो वसन तिचें भिजवुनी
गातात वीचि या मंजुळशा ओंठ्यातें।
ही नाव चिमुकली खालींवर डोलते।
भंवतालिं तियेच्या बाल–चमू खेळते।
एकतानता पुरे! अतां बघ एकवार त्याकडे
दृश्य हें नयनमनोहर गडे ॥ २ ॥

सरल नासिका मीनाक्षी ही भाल सुबक श्यामला
चढतसें तेज यौवनें तिला।
जरि वसनें साधीं सतेज तनु खुलविती।
विपुलशीं कंकणें एका करिं शोभतीं।
कानांत तियेच्या कर्णफुलें डोलतीं।
विविध तऱ्हेच्या काचमण्यांची गळयामधें गळसरी
रुळतसे उन्नत वक्षावरी ॥ ३ ॥

नजर खालती तल्लिन होसी देखुनी येतें मनीं
जात का सकल दुःख विसरुनी ।
गुंफिशी जाल का प्रेम–तंतु कांतुनी ।
ना मीन परी गे युवक कुणी येउनी ।
पाहतां तुला तो सकल भान विसरुनी ।
जाळ्यामाजीं पडेल लुटण्या प्रीतीची माधुरी
येतसे शंका ही अंतरीं ॥ ४ ॥

७–७–४२

* * *

# ४ माहेरच्या पांखरा—

ये इथें बैस ये जरा
माझ्या माहेरच्या पांखरा ॥ ध्रु० ॥
उल्लंघिसि बा सरिता अवघड ।
हृदयाची किति चाले घडघड ।
पंख हलवुनी करिशी फडफड ।
विश्रांती तूं घेइ जरा । माझ्या० ॥ १ ॥
टुवी टुवी मधु बोल ऐकिले ।
ओळख पटली धांवत आलें ।
माहेराचें स्मरण जाहलें ।
तुजमुळेंच रे खगवरा ॥ माझ्या० ॥ २ ॥
फुलें वेंचितां बकुळीखालीं ।
तव कवनें मीं तिथें ऐकिलीं ।
तीच लकेरी तुवां घेतली ।
आलास माझिया घरा । माझ्या० ॥ ३ ॥
खुशाल का रे बाबा-आई ।
दादा, वहिनी, बेबी, ताई ।
निरोप कसला धाडुन देई
चल सांग करुनिया त्वरा । माझ्या० ॥ ४ ॥
नका नका ग उडवुं तयाला ।
जीव चिमुकला धांवत आला ।
निरोप मजला सांगायाला ।
हा दूत येतसे घरा । माझ्या० ॥ ५ ॥

* * *

## ५ जेव्हां जाइन घरीं–

जेव्हां जाइन घरीं—
अशी का दिसेल मम सुंदरी?—॥ ध्रु० ॥

प्रभातकालीं स्नान करोनी।
कृष्णकेश घन मुक्त सोडुनी।
अथवा भुजंग–वेणी घालुनी।
सोडिल पाठीवरी। अशी का० ॥ १ ॥

लेवुनि वसनें रम्य गुलाबी।
जिच्या कपोलीं छटा गुलाबी।
पर्णासह शिरिं सुमन गुलाबी।
बसून स्पर्धा करी। अशी का० ॥ २ ॥

मंगल दीपावलि ये म्हणुनी।
पर्ण–तोरणें करांत धरुनी।
पद–तल किंचित उंच करोनी।
बांधी दारावरी। अशी का० ॥ ३ ॥

भ्रुकुटि धनूसम, मान वळवुनी।
रंगवल्लिका रेखित अंगणिं।
दिसेल मजला शुक्रचांदणी।
अवतरली भूवरी। अशी का० ॥ ४ ॥

सख्या समवयी जमतिल जेव्हां।
विनोद करुनी हंसेल तेव्हां।
त्या मुखकमला पाहिन केव्हां।
मना धीर तूं धरी। अशी का० ॥ ५ ॥

मधु पक्वान्नें करुनी श्रमली ।
विश्रांतिस्तव असे पहुडली ।
गोंडस करतल ठेवुनि गालीं ।
चित्र रम्य किति तरी । अशी का० ॥ ६ ॥

उभी प्रियतमा नयनापुढती ।
काय जाउं हळु तिच्या मागुती ।
नयन झांकुनी गालावरती ।
ठेवुं अधर झडकरी । प्रीतिची खूण उठवुं का तरी ? । अशी का० ॥ ७ ॥

२५–९–४२

* * *

## ६ निसर्गाचा प्रणय

तरु–शाखेचा करुनी झोला
त्यावरि बसुनी रमवुं जिवाला।

हरितलता दृढ तरुंस बिलगती
आलिंगुनि त्यां तरू डोलती।

विहगांचीं वरि युग्में बसुनी
दिव्य प्रीतिचीं गाती गाणीं।

नाचत गुंगत मधुपहि येती
चुंबुनि सुमना हितगुज करिती।

मंद वायुच्या लहरी येउनि
पुष्प–परागा देती उधळुनि।

सागरास भेटाया जातां
उत्सुकतेनें धांवे सरिता।

निर्झरिणीसह निर्झर खेळे
प्रवाह दोन्ही समरस झाले।

अरुण–उषेचा खेळ चालला
रंग केशरी नभिं उधळिला।

निसर्ग खेळे खेळ प्रीतिचा
पहा लाडके किति गमतीचा।

उंच उंच नभिं झोका घेऊं
सुखदुःखाला विसरुनि जाऊं।

* * *

# ७ नका पाहूं निरखोनी

माझ्या ग घरीं डोले। पाळणा चंदनाचा
त्यांत झोंप घेई बाई। बाळ नव्या नवसाचा ॥ १ ॥
माझ्या ग बाळाची। पाहुनिया मृदु कांति
पानाआड लपुनिया। बैसे धवल केतकी ॥ २ ॥
माझ्या ग बाळाचें। काळें कुरळें जावळ
खिन्न भ्रमर जाहले। फिरताती रानोमाळ ॥ ३ ॥
माझ्या ग बाळाच्या। नयनींचें देखे पाणी
राहे स्तिमित होउनी। आकाशिंची ताराराणी ॥ ४ ॥
माझ्या ग बाळाच्या। रंग गालाचा देखिला
आपुल्या त्या फुलांसाठीं। गुलाबानें मागितला ॥ ५ ॥
माझ्या ग बाळाच्या। देखतांची दंतपंक्ति
सागराच्या तळीं गेले। लपावया शुभ्र मोती ॥ ६ ॥
माझ्या ग बाळाची। रम्य नासिका देखिली
तैशी नाहीं म्हणोनिया। चांफेकळी ती रुसली ॥ ७ ॥
माझ्या ग बाळाचें। मुख प्रफुल्ल देखोनी
मनीं लज्जित जाहली। बैसे पंकीं कमलिनी ॥ ८ ॥
माझ्या ग बाळाचे। बोल बोबडे ऐकोनी
बुल्बुल् वृक्षीं बैसे मुग्ध। घेई पानें पांघरोनी ॥ ९ ॥
खोल खोल हृदयांत। ठेवूं काय बाळ त्यांत
अखंड ही तेवो गृहीं। माझ्या प्रीतिची ग ज्योत ॥ १० ॥
ऐसा माझा बाळ बाई। नित्य खेळतो अंगणीं
त्याला दृष्ट लागेल ग। नका पाहूं निरखोनी ॥ ११ ॥

* * *

## ८ " गडे असें मी... "

जरि अढळ आपुली ही प्रीती
मग धरिशि कशाला मनिं भीती ॥ ध्रु० ॥

करिं कर देतां कंप पावती।
नजर कशाला अशी खालती।
द्रवबिंदूसम भालावरती।
हे घर्मबिंदु किति चमचमती। मग धरिशि० ॥ १ ॥

कडे कपारां फोडुनि सरिता।
सागरास भेटाया जातां।
काय भीति लव शिवते चित्ता।
ना कुणी तयांना विभागती। मग धरिशि० ॥ २ ॥

चल ये जाऊं प्रेमोद्यानीं।
गाउं प्रीतिचीं मंजुळ गाणीं।
नको म्हणूं ग, 'हंसतिल कोणी'।
कां अधर अजुनि तव थरथरती। मग धरिशि० ॥ ३ ॥

दो हृदयांची ओळख पटली।
प्रेमभावना विकसित झाली।
" गडे, असें मी खचित आपुली "।
लाजुनी हळु वदे मग युवती। देउनी तयाच्या कर हातीं ॥ ४ ॥

१५-१२-४०

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५०३८ वि: काव्य
क्रमांक २७३३ नों दि: २५।५।५

## १ तो क्षण

डावा कर ठेवुनी कटिवरी, उजव्या हातीं फणी।
न्हाउनी होतिस उभि अंगणीं।
वदन–सरोजावरी केश तव इतस्तता नाचले
थवे जणु भ्रमरांचे भासले।
अवखळ वाऱ्यानें झोंबुनिया पदर तुझा उडविला
तयाचा मत्सर मज वाटला।
तुजसम नाजुक प्रफुल्ल लतिका जरि भंवतीं डोलती
उमगलें त्यांतिल तूं कोण ती।
तव तनुलागी स्पर्शुनि वायू मम अंगा लागला
सुखाचा क्षण मज तो वाटला।
बकुल–वृक्ष जो सन्निध होता, सुमनें बहु बहरलीं
तयानें तुजवरि तीं उधळिलीं।
दचकुनि पाहसि सभोंवतालीं नजर पडे मजवरी
जाहलों मंत्रमुग्ध क्षणभरी।
लज्जित झालिस तेव्हां वदनीं पाहुनिया रक्तिमा
फुले मम हृदयांतरिं पौर्णिमा।
मुका बोल प्रीतिचा भाव जों सहजच मीं जाणिला
तोंच तुज साद कुणीं घातला।
गेलीस प्रियतमे क्षणार्धांत तेथुनी।
जणु विहग जातसे पक्व फला टोंचुनी।
परि बसलिस माझ्या हृदयिं ठाव देउनी।
घटिका गेल्या पळेंहि गेलीं गेले यापरि दिन
अजुनिया स्मरतो मज तो क्षण।

* * *

## १० पुरे ही रेशनची नोकरी

कां लगबग ऐशी करी,
चालली कुणीकडे ही तरी ॥ ध्रु० ॥

पाठीवरती रुळते वेणी ।
काजळ घालुनि विशाल नयनीं
रंग गालिंचा गेला पुसुनी ।
मुख घर्मे भिजलें परी । चालली० ॥ १ ॥

घड्याळ इवलें करांत साजे ।
डाव्या हातीं बॅग विराजे ।
चाले, टपटप पाउल वाजे ।
थबकुनी उभी कां तरी । चालली० ॥ २

येति वाहनें, तशींच गेलीं ।
कळे न कां तीं तिनें सोडिलीं ।
सभोंवतालीं नजर फेंकिली ।
होउनि अति घाबरी । चालली० ॥ ३ ॥

शोधित होती तरुणी ज्याला ।
दुरुनी येतां तिनें पाहिला ।
रुमाल हलवुनि दावि खुणेला ।
हो हर्षित हृदयांतरीं । चालली० ॥ ४ ॥

मृदु कर झडकरि करीं घेउनी ।
वदनावरती नजर रोखुनी ।
बोले तिजला अधिर होउनी ।
" सांगतों ऐक झडकरी–" । चालली० ॥ ५ ॥

"पुरे अतां त्या शिधापत्रिका।
हव्या कशाला दुग्ध–पत्रिका ।
चल चल लिहुं या लग्न–पत्रिका।
हें युद्ध थांबलें तरी। पुरे ही रेशनची नोकरी" ॥ ६ ॥

* * *

## ११ ब्रह्मानंद

कुणी म्हणती ओंकार ब्रह्म त्याला।
ख्रिस्त म्हणती, म्हणतात कुणी अल्ला ॥
भजति कोणी त्या बुद्ध गौतमाला ।
देवं मानीती कुणी निसर्गाला ॥ १ ॥
विविध मार्गें जन तयां सतत ध्याती।
म्हणति लाभे चित्तास पूर्ण शांति ॥
मनीं आलें हा सुलभ मार्ग साचा।
शांति चित्ता आनंद भोगण्याचा ॥ २ ॥
वसे शांती जगतांत सतत जेथें।
तिळ न संशय प्रभुराज वसे तेथें ॥
उठे कोलाहल मानसांत ऐसा।
क्षुब्ध उदधी जणुं उफाळला जैसा ॥ ३ ॥
ब्रह्म, शांती, आनंद भोगण्याला ।
बहुत फिरलें मी तया शोधण्याला ॥
श्रमित झालें चालुनी विविध वाटे।
परी मजला ना समाधान वाटे ॥ ४ ॥
ब्रह्म देखाया शिवालयीं गेले।
ख्रिस्त–देऊळीं प्रार्थनेस आलें ॥
पहायासी अल्लासि मशीदींत ।
तशी गेलें मी बुद्ध विहारांत ॥ ५ ॥
निराशेनें परतलें घरीं जेव्हां ।
हसित–वदनें बिलगलें बाळ तेव्हां ॥
कडे घेऊनी चुंबिलें तयाला।
ब्रह्म दिसलें, सुख–शांति लाभ झाला ॥ ६ ॥

* * *

## १२ कुणासारखा ? ...

दिन गेले बहु होउनी
प्रियेला माहेरीं जाउनी ॥ ध्रु० ॥
नवनवतीचें पहिलेंवहिलें ।
बालसुमन नव जन्मा आलें ।
भेटाया मन अधिर जाहलें ।
जातसे रजा घेउनी । प्रियेला० ॥ १ ॥
अंगणिं येतां पतिस पाहिलें ।
" अगबई ! अवचित येणें झालें !
आधीं पत्र न कां पाठविलें ? " ।
पुसतसे तयालागुनी । प्रियेला० ॥ २ ॥
चपलेसम मग धांवत जाई ।
बाल गोजिरें घेउनि येई ।
" घ्या ना " म्हणुनी करांत देई ।
धारे छकुल्याला कवळुनी । प्रियेला० ॥ ३ ॥
हर्ष अमुप जाहला उभयतां ।
पुत्रवदन तें गोंडस बघतां ।
संसाराला येइ पूर्णता ।
सुखदुःख जात विसरुनी । प्रियेला० ॥ ४ ॥
सस्मित वदनें पुसे तयाला ।
" गडे ! खरें सांगावें, झाला— ।
कुणासारखा बाळ आपुला ? " ।
मुख बाळाचें चुंबुनी । प्रियेला० ॥ ५ ॥

* * *

## १३ बोल बोबडे...

काजळी अवस बाहेर असे ।
मम गृहीं चांदणें परि विलसे ॥ ध्रु० ॥
खेळे सदनीं माझा छकुला ।
जणूं चंद्रमा धवल उगवला ।
तिमिर सकलही नाश पावला ।
चहुंकडे चंद्रिका वितरतसे ॥ मम गृहीं० ॥ १ ॥
बाळ सानुलें जेव्हां हंसतें ।
विश्व-कमल जणुं विकसित होतें ।
चराचराला सवें खुलवितें ।
दुःखास ठाव मग तिळहि नसे ॥ मम गृहीं० ॥ २ ॥
बोल बोबडे वाटे ऐकुनि ।
ब्रह्म-नाद कीं घुमतो कानीं ।
सकल भान मम जात हरपुनी ।
त्या क्षणीं दिव्यता नयनिं दिसे । मम गृहीं० ॥ ३ ॥

२-१-५२

* * *

## १४ चुकामूक[†]

असतात भेटला पहिल्यानें मज जरी ।
निर्मिलेंचि असतें नंदनवन भूवरी ॥ १ ॥
टाकितें हृदयिंची रम्य बाग फुलवुनी ।
मग येतीं त्यांवर प्रीति-फुलें बहरुनी ॥ २ ॥
मी गेलें असतें खचित जगा विसरुनी ।
सहवासिं आपुल्या समरसता पावुनी ॥ ३ ॥
मम करांत घरुनी कर दोन्ही आपुले ।
भय मनिं न टाकण्या जीवनपथिं पाउलें ॥ ४ ॥
झुंजण्यास बळ ये काळाच्या संगतीं ।
लाभता मला जरि जन्माचे सोबती ॥ ५ ॥
या हृदय-कपाटीं कां शिरला चोरुन ।
सांगतें अतां झडकरी निघा तेथुन ॥ ६ ॥
आपुल्या जिवाची असतें जरि स्वामिनी ।
आनंद चहुकडे देतें मी उधळुनी ॥ ७ ॥
कां नाहिं भेटलां आधीं मजला तरी ।
हे विचार आतां फोलच वाऱ्यावरी ॥ ८ ॥
विधि घडवि कशाला भेट अशी आपुली ।
हुरहूर फुकटची मात्र जिवा लागली ॥ ९ ॥
निशिदिनीं येउनी विवेक जागृत करी ।
" तूं असासि दुज्याची स्मृती ठेव अंतरीं " ॥ १० ॥
भेटता मला पहिल्यानें तुम्ही जरी ।
परि हवे कशाला शब्द अतां ' जरि तरी ' ॥ ११ ॥

१४–३–४३

† ऑल इंडिया रेडियोच्या सौजन्यानें

* * *

## १५ जगाला काय तयाची क्षिति !

जाय दिनमणी अस्तालागीं हळू चोर पाउलीं
लगबगा जिऊ घरा पातली ।
पोटासाठीं दिनभर खपली यंत्राजवळी जरी
घराची ओढ तिच्या अंतरीं ।
दोन खणांची पुरी न जागा अंधकार त्या स्थळीं
चहुकडे दुर्गंधी कोंदली ।
मळक्या फडक्यावरी रोडकें बाळ एक झोंपलें
उचलुनी तिनें तया चुंबिलें ।
हाय ! रडतसे जिउ धेनूपरि हंबरडा फोडुनी
चिमणा बाळ थंड पाहुनी ।
पोटास भाकरी मिळवाया जातसे ।
प्रतिदिनीं अफूची गोळी त्या देतसे ।
अज्ञान अधनता दोन्ही जेथें वसे ।
असंख्य ऐसे बळी स्थळीं त्या पडले, पडतिल किती
जगाला काय तयाची क्षिती ।

* * *

आॅल इंडिया रेडियोच्या सौजन्यानें

# १६ चित्त-चोरटे

पहावयासी मजला आलां । तेव्हां लाजुनि आंत पळालें ॥
दारामागें उभी राहुनी । हळूच चोरुनि तुम्हां पाहिलें ॥
सतेज कांती, विशाल छाती । भाल विशालहि तसेच डोळे ॥
प्रसन्न वदनीं तेज देखतां । देहभान मम सकल हरपलें ॥
डौलदारशी चाल आपुली । पाहुनि माझ्या मनांत आलें– ॥
लाभतील का मजसि हे पती । अशा विचारीं गुंगुनि गेलें ॥
हांक मारितां मला पित्यानें । तुमच्यापुढती उभी राहिलें ॥
चित्त-चोरटे खचित तुम्ही हो । त्याच क्षणीं हें हृदय जिंकिलें ॥
वाद्यांचा बहु गजर जाहला । कर मम तुम्हीं करीं घेतले ॥
तुम्हासारखे जगीं सोबती । धन्य धन्य मी—मला लाभले ॥
दुजा भाव ना मनीं राहिला । दो हृदयांचें मीलन झालें ॥
करपाशीं मज दृढतर धरुनी । गालावरती अधर टेकिले ॥

* * *

जागी होउनि नयन उघडितां । हाय ! स्वप्न हें उमगुनि आलें ॥
दिन गेले बहु वर्षे गेलीं । स्मरण तयाचें अजुनि राहिलें ॥

***

आॅल इंडिया रेडियोच्या सौजन्यानें

# १७ कां ?

“ शेजारिणीबाई !
बाळ कडे कां ग घेशी ? ”
**शेजारीण :** खडे कांटे अंगणांत
बोंचतील चरणाशीं ॥ १ ॥
“ शेजारिणीबाई !
तीट बाळा कां लाविशी ? ”
**शेजारीण :** डाग काळा शोभतसे
आकाशींच्या चांदोबाशीं ॥ २ ॥
“ शेजारिणीबाई !
बाळ झांकी पदरानें ? ”
**शेजारीण :** कोमेजेल माझं फूल
तीव्र–सूर्य आतपानें ॥ ३ ॥
“ शेजारिणीबाई !
नेशी घरांत कां बाळ ? ”
**शेजारीण :** दूध ताजं आलं घरीं
झाली भूकेची ग वेळ ॥ ४ ॥
“ शेजारिणीबाई !
नको नेऊं त्यासी दुरी
बाळ आहे तुझा जरी
पाहुं दे ग डोळे भरी ” ॥ ५ ॥
हाय निपुत्रिका मी
दृष्ट लागेल तयाला
ऐसें मनिं येउनिया
काय बाळ आंत नेला ॥ ६ ॥

* * *

## १८ कां पडतीं तव मंद पाउलें ?

हिरवा–हिरवा शालु नेसुनी ।
तशी कंचुकी हिरवी लेवुनि ।
हार पांचुचा गळयांत हिरवा ।
वेणीमध्यें दवणा–मरवा ॥ १ ॥

करीं कंकणें शोभति हिरवीं ।
पायाखालीं हिरवळ हिरवी ।
कां पडतीं तव मंद पाउलें ?— ।
गुपित तयाचें अम्हां उमगलें ॥ २ ॥

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 10048
संदर्भ शाखा

## १९ प्रवासी

प्रवासी कुणि चालला प्रवासाशीं ।
दुजा भेटे मग अकस्मात् त्याशीं ॥
भिन्न गांवाहुनि जरी उभय येती ।
एकमेकांसह पुढें पुढें जाती ॥ १ ॥

नसे ठाउक त्यां कोण कुठुनि आला ।
मार्गि त्यांचा परि स्नेह जुळुनि गेला ॥
मधुर ऐशीं कधिं फळें भक्षण्याला ।
कधीं दुःखाचा धरित अधरिं पेला ॥ २ ॥

ध्येय तेंची अन् लाभ संगतीचा ।
शीण भासेना त्यांसि प्रवासाचा ॥
एक त्यांतुनिया दुजीकडे बाई ।
निघुनि गेला तरि दुजा पुढें जाई ॥ ३ ॥

* * *

## २० शकुन

दुष्ट वायसा। उडुनि जा कसा।
कर्णकटु शब्द करिशि व्यर्थ कां असा ॥ १ ॥
तुजशि उडवुनी। लावितें झणीं।
फिरुनि फिरुनि बैससि कां सांग येउनी ॥ २ ॥
वळुनि पाहसी। काय सांगसी।
सांग शकुन—येतिल का आज ते निशीं ॥ ३ ॥
पत्रवाहकें। तुजसि कवतुकें।
दूत म्हणुनि धाडियलें काय बा निकें ? ॥ ४ ॥

*　　*　　*

पत्रवाहका,। असें पत्र का ?।
सांग झणीं दवडुं नको वेळ तूं फुका ॥ ५ ॥
पत्र देखुनी। तोषली मनीं।
येतिल का आज गड्या म्हणत लाजुनी ॥ ६ ॥
'शब्द कटु जरी। प्रिय मला तरी।
बोल !' वदे, तोंच उडे काका तरुवरी ॥ ७ ॥

* * *

# २१ उषा

हंसित मुदित ही उषा पातली ।
अरुण नभीं आला ॥
उठा चला हो सकल जाउं या ।
स्वागत करण्याला ॥ १ ॥
विश्व–कमल हें विकसित झालें ।
उघडुन अपुल्या दलां ॥
गंध तयाचा जणुं पसराया ।
वायु येत झुळझुळा ॥ २ ॥
अरुण उषेला रमवाया कीं ।
विहग गान गाती ॥
विकसित सुमनें मोदभरें तीं ॥
तरुवरती डुलतीं ॥ ३ ॥
कोमल किरणें–नव्हे, हर्ष नभिं ।
उधळुनिया दिधला ॥
प्रभात-कालीं नवजीवन दे ।
अखिलहि जगताला ॥ ४ ॥

* * *

## २२ खरी तूंच मैत्रिण

मन उत्कंठित हो गडे ! तुला भेटाया ।
तुजवीण वाटतें क्षण-पळ गेला वायां ॥
हो अधिर भेटण्या, धांव घेउनी येई ।
जवळिं उषेच्या प्रभात जेंवी जाई ॥
लाभ हा तुझा गे, दुर्मिळ हो सर्वाला ।
तहान–भूकहि विसरवुनीयां तृप्ति देशि चित्ताला ॥
भेटतां एकटी हितगुज करिशी मजशीं ।
ना दवडिशि वाया वेळ, स्फूर्ति मज देशी ॥
लागती कवींचे डोळे तुजकडे ।
हो अधिर दर्शना घ्याया बापुडे ।
मानिती भाग्य सहवासीं तव गडे ।
ना येशी तरि गे शांतवील मज कोण ।
हे ! कविते माझी खरी तूंच मैत्रीण ॥

***

## २३ ‘ एकताच आलों ! ’

ते बोल बोबडे अजुनी घुमती कानीं ।
‘ एकताच आलों ’ वदलें बालक हंसुनी ॥
उघडितां दार मग येइ धांव घेउनी ।
‘ एकताच आलों ’ येई गंभिर वाणी ॥
जरि सवें आइच्या येत, पुढें धांवोनी,
परि फसवें चमके हास्य तयाच्या वदनीं ॥
‘ एकताच आलों ’ बाळ वदे डौलानें ।
कौतूक वाटलें हंसलें मी प्रेमानें ॥
बहुकाल लोटला ते दिन गेले निघुनी ।
ते बोल अजुनिया घुमती माझ्या कानीं ।

* * *

एकटाच आला मानव जगतीं येथें
एकटाच जाइल आला जेथुनी तेथें ॥

* * *

# २४ भंगलेली प्रीति

कांचपात्र भंगलें एकदां काय सांधतें पुन्हां ।
जोडणें व्यर्थ आस ही मना ॥

नभिंचा तारा पतन पावतां भूवरती येतसे।
काय तो पुन्हां नभीं जातसे ॥

गलित सुमन त्या वेलीवरिचें क्षणिं नाश पावतें ।
फिरुनि का वेलीवरि डोलतें ॥

या हृदय उपवनीं प्रीति–वेल रोंविली ।
वंचिली तिला ना जलें तुम्ही सिंचिली ।
बहरेल कशी ती ? परी अतां, तोडिली ! ।
सुमनविरहिता वल्लि निमाली आंच मना लागते ।
भंगली प्रीती ना सांधते ॥

* * *

## २५ कुठें विसावूं ?

वाहत होता भणभण वारा ।
आणि वर्षल्या घनजल धारा ॥
चमकुनि गेली चंचल चपला ।
कडकडुनीया मेघ गर्जला ॥
भीतीनें मी कंपित झालें ।
आणि तुझ्या दृढ उरीं बिलगलें ॥
भेट आपुली याच तरु–तलीं ।
आठवते का सख्या !—जाहली ? ॥

* * *

तसाच वाहत आहे वारा ।
तशा वर्षती घंन जल–धारा ॥
तसाच करितो मेघ गर्जना ।
चंचल चपला करी नर्तना ॥
उभा तसा तो तरुहि त्या स्थलीं ।
तशींच भीती मला वाटली ॥

* * *

परी तुझ्याविण जीवित ओझें ।
कुठें विसावूं मस्तक माझें ? ॥

* * *

## २६ मुरड–कानवला

आतां साठ अधीक पांच वरुषें माझ्या वया जाहलीं ।
बोलाया बळ नाहिं रे, मम अतां दृष्टीहि मंदावली ॥
ऐकूंही नच येइ, पान पिकलें, हे हातही कांपती ।
जीवाची कशि ती मुला, क्षणभरी नाहीं मुळी शाश्वती ॥ १ ॥

जाण्याचा समरांगणावरि वृथा कां हट्ट घेशी असा ।
ऐशा वृद्धपणीं हताश अशि मी, सोडून जाशी कसा ॥
आहे एकुलताचि एक उरला, त्यांतूनि शेंडेंफळ ।
त्यातें दूर करोनि राहुं कशि मी साहूनि शोकानल ॥ २ ॥

नाहीं सोडुनि राहिला, दिवसही, साही वियोगा न हा ।
वर्षांचा इतुक्या तुटेलचि कसा मायेचिया पाश हा ।
दुर्दैवें जरि काळ नेइ तुजशीं येथेंच, मी सोशिन ॥
स्वर्गीं जाशिल रे सुखेंचि शिर या मांडीवरी ठेवुन ॥ ३ ॥

किंवा आस तुझी " करीन वडिलें सन्नाम केलें जसें " ।
भाग्याच्या तव आड येउं कशि मी, नाहीं म्हणूं रे कसें ॥
आहे वंद्य जगीं जशी स्वजननी, हो मायभूमी तशी ।
व्हावें तूं ऋणमुक्त सेवुनि अगा ! अत्यादरानें तिशीं ॥ ४ ॥

परतुनी निजगृहीं झणिं यावया ।
करितसे मुरुड–कानवल्यास या ॥
कर पुढें करिं तुझ्या दधि घालितें ।
विजयि हो तुजला शुभ चिंतितें ॥ ५ ॥

* * *

## २७ जीवित–साफल्य

कुणी तरुणीनें वेल लावियेली ।
शिंपुनीया जल तिला वाढवीली ॥
थोर होतां चढविली तरूवरती ।
यौवनाला मग येइ तिच्या भरती ॥ १ ॥

अहा सुमनाचा बहर तिला आला ।
झुले हंसरा तंव वेलिवरी झोला ॥
फळांचे ते घोंस शिरीं आले ।
तिचें जीवन जगिं खचित सार्थ झालें ॥ २ ॥

फलें पाही, तोषली मनीं युवती ।
म्हणे " माझे श्रम बाइ ! सफल होती. " ॥
वदे ऐसें तों नयनिं अश्रु आले ।
सुखादु:खाचे भाव तिथें दिसले ॥ ३ ॥

" बाई वेली तुज फुलें–फळें आलीं ।
जीवनाची पूर्णता तुझ्या झाली ॥
हाय ! माझें किति आयु फोल पाही ।
भाग्यहीना मी, घरीं बाळ नाहीं. " ॥ ४ ॥

* * *

## २८ यमुने–तीरीं

घागर भरण्या यमुने–तीरीं। चल ये बाई ग
चल ये चल ये चल ये ग।
लपुनी छपुनी बघतो कान्हा। घागर फोडिल ग। चल ये ॥
अधरीं बांसरी धरुनि श्रीहरी। वाजवुनी मन मोही ग। चल ये ॥
मधु–मुरलीचा नाद ऐकुनी। पाझरली ही घागर ग। चल ये ॥

* * *

## २९ जिव्हास्त्र

लपतछपत तूं गृहीं बैसुनी शब्दबाण सोडिशी।
व्यर्थ कां हृदय असें छेदिशी ॥
नागिण जहरी दंश विषारी हाय ! घात करितसे।
काय हें ठाउक सकलां नसे ॥
रुधिर–मांस–मृदु तनू तव जरी घाव तीव्र भासतो
चरचरा हृदय सहज कापितो ॥
वाटते तुझ्याहुनि तीक्ष्ण सुरी गे बरी।
करितसे घाव ती केवल देहावरी।
पडतांच घाव ती प्राण हरण मग करी।
तीक्ष्ण सुरी जरि उरीं मारिली घाव सौम्य भासतो।
भयानक तुजहुनि ना वाटतो ॥

* * *

## ३० क्षुद्र कीटका !

रे रे मानिसि कीटका जगत तूं औदुंबराच्या फला।
सौख्यें नांदसि मग्न तेथ बसुनी राजाच कीं तेथला।
ये ये रे, फल छेदुनी, बघ झणीं हें विश्व आहे कसें।
ज्याचा आदि नि अंत नाहिं कळला, केलें कुणी रे कसें॥

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५०३६ वि: ३/०५
क्रमांक ९१२३३ नों: दि: २६/५/५६

## ३१ ज्ञान–दीप

जरी चिमुकली दिसते पणती ।
जळे तियेची प्रशांत ज्योती ।
तेल जळे परि प्रकाश देते ।
काळोखा ती सकल नाशिते ॥
ज्ञान–दीप हा करीं घेउनी ।
अज्ञ–तमातें टाकू वारुनी ।
ज्ञान–ज्योतिचीं प्रकाश–किरणें ।
उजळतील मग सारीं सदनें ॥
ध्येय–ज्योति परि ध्यानीं ठेवूं ।
जीवनसार्थक करुनी घेऊं ॥

* * *

## ३२ मृत वधू बनती--

मृत वधू बनती नभिं तारका ॥
वदतसे कवि हें नच तें फुका ॥
दिसति नित्य नवोदित चांदण्या ॥
कुठुनि येति तरी मन वेधण्या ॥ १ ॥

* * *

# ३३ सांगूं नये हं कुणा– !

मंगलदायक येइ पाडवा, काय हवं ग तुला?
सखे ग सांग मनांतिल मला ॥
शालु बनारसि रंग पोपटी बुट्टया चमकति वरी
शोभतो पदर जया भरजरी ॥
रत्नजडित तुज सांग हवा का गळ्यांतील तन्मणी?
कवतुकें बघतिल तव मैत्रिणी ॥
असे बिलोरी ज्यास आरसा कपाट तुज आणुं का?
डोलण्या हिंदोळा बांधुं का ?
नजर खालती उभी अशी कां शंका ये का तुला?
खचित तूं प्राणाहुनि प्रिय मला ॥
मुग्ध अशी का बोल सखे ग! हौस तुझी पुरवीन।
भूवरी निर्मिन नंदनवन ।

× × × ×

लज्जित झाली हळूच वदली, 'सांगुं नये हं कुणा–
अणावा सुबक नवा पाळणा !' ॥

* * *

# ३४ निराशता मग सकळ पळाली !

नभ हें सारें धुंद जाहलें
दाहि दिशा ह्या धुंद जाहल्या ।
धुंद अशा या वातावरणीं
निराशतेच्या पडति सांवल्या ॥ १ ॥
    नजर फेकितां गवाक्षांतुनी
    चहूंकडे मज धुंदी दिसली ।
    निराशतेच्या बुरख्यामाजी
    सृष्टिदेवता झांकुनि गेली ॥ २ ॥
पारिजात तरु–शाखेवरती
नव्हतीं पानें, नव्हतीं सुमनें ।
अंग मुडपुनी वरी बैसला

× × ×

विहग एकला निराशतेनें ॥ ३ ॥
इतुक्यामध्यें गोडलकेरी
अवचित माझ्या कानीं पडली ।
विहगाची अन् तशीच माझी
निराशता मग सकल पळाली ॥ ४ ॥

* * *

## ३५ रंगीत पाळणा

रंगित पाळणा माझ्या ग घरीं
मोत्यांची झालर, रेशमी दोरी । जो बाळा जो ।
रंगित पाळणा माझ्या ग घरीं
चिमण्यांचें छत, हालतें वरी । जो बाळा जो ।
रंगित पाळणा घरीं ग डोले
बाळ सानुलें त्यांत झोंपलें । जो बाळा जो ।
रंगित पाळणा घरीं बांधिला
पाहाया आकाशीं चांदोबा आला । जो बाळा जो ।
रंगित पाळणा माझ्या बाळाचा
आहे ग बाई पृथ्वीमोलाचा । जो बाळा जो ।
रंगित पाळण्या ! अखंड डोल
ऐकूं दे बाळाचे बोबडे बोल । जो बाळा जो ।

* * *

## ३६ न कळे कोठें गेली बाला !

पारिजात तरु स्वर्गींचा जो
भूवरिं अणिला श्रीकृष्णानें ।
पुष्पसंपदा शिरीं घेउनी
डोलत होता आनंदानें ॥ १ ॥

वहात होता झुळुझुळु वारा
सुमनें तरु-तलिं टप टप पडलीं ।
चुंबायातें धरणीलागी
नक्षत्रें जणु भूवरिं आलीं ॥ २ ॥

सुमनानें तो बहरुनि गेला
पडे फुलांची पखरण खालीं ।
सुहास्य वदनें येइ बालिका
फुलें वेंचण्या प्रभात कालीं ॥ ३ ॥

सडा फुलांचा देखतांच ती
मनांत हर्षित झाली बाला ।
ओंजळ भरुनी भरुनी घेतां
समाधान ना तिच्या मनाला ॥ ४ ॥

पडोत सुमनें खालीं म्हणुनि
हलवी धरुनी तरु–शाखेला ।
“ दिलीं तुला ना ? पुरे न का तीं ” ?
पारिजात तिज हळूंच वदला ॥ ५ ॥

× × ×

तशीच पडली पखरण खालीं
सुगंध त्याचा भंवतीं सुटला ।
थरावरी थर सुकुनी गेले
न कळे कोठें गेली बाला ! ॥ ६ ॥

* * *

## ३७ संताजी किल्लेदार

गडावरी गडकरी नेमिला
नामें संताजी ।
सकलांना प्रिय असे, न होई
कोणी इतराजी ।
उंच भव्य तो देह तयाचा
ताड वृक्ष जैसा ।
विशाल वक्षस्थल हो त्याचें
रणिं केसरि तैसा ।
गंभिर वदना मिशा शोभती
बहु झुबकेदार ।
कलि*ाळाचा काळ असे तो
रणिं किल्लेदार ।
पाणिदार बहु दोन टपोरीं
मोत्यें त्या कानीं ।
जरिपटक्याचा पदर उडतसे
फडफड त्यावरुनी ।
लोहस्तंभ जणुं बाहु तयाचे
होता अति मानी ।
तयें पाजिलें अजवरि अरिंना
खड्गाचें पाणी ।
भव्य आकृती गंभिर मुद्रा
निश्चयता दावी ।
तैल बुद्धि त्या संताजीची
कितीक वर्णावी ! ॥

* * *

## ३८ झोंप सुखें--

जो जो जो जो रे । गुणि बाळा । झोंप सुखें लडिवाळा ।
निजले बघ आतां । जग सारें । नीज सुखें आतां रे ।
निजवी रजनी ती । विश्वाला । झोंका देउनि त्याला ।
अंगावर घाली । जरतारी । सुंदर काळा शेला ।
बघ रे तव आई । अंगाई । म्हणुनी झोंके देई ।
थांब पुरे चाळा । वेल्हाळा । झोंप शांत रे बाळा ।

* * *

## ३९ अविट गोडी लेखनीं—

सुरस कविता, लघुकथा तशा गोष्टी।
वर्णिलेली कल्पनारम्य सृष्टी।
बघुनि वाटे मज मीं तसें लिहावें
काव्य–उद्यानीं गुंगुनिया जावें ॥ १ ॥

बसुनि ईर्षेनें करुनिया विचार।
लिहुनि ओळी मग कशा तरी चार।
वाचुनी त्या आनंद फार झाला।
शब्द अपुरे पडतील वर्णनाला ॥ २ ॥

काव्य धाडियलें मासिकास एका।
स्वर्ग येई हातांत, –परी ऐका।
काव्यक्षेत्रीं जागाच नसे ‘ खाली ’।
म्हणुनि कविता साभार परत आली ॥ ३ ॥

जरी कविता साभार परत आली।
काव्यसारिता मी नाहिं थांबवीली।
म्हणो कोणी मज एक अज्ञ वेडी।
त्यांस न कळे काव्यांत काय गोडी ॥ ४ ॥

काव्यलेखनिं मन होत असे धुंद।
लिहुनि पुरवी मी आपुलाच छंद।
प्रसिद्धीची मज नुरे तिळहि हौस।
अविट गोडी लेखनीं असे खास ॥ ५ ॥

* * *

# ४० झोंप येईना कशी--!

झोंप येईना कशी, सांग तुला सोनुले ! ॥ ध्रु. ॥
रातकिडे किरकिरती । बागुलबोवा टेहळती ॥
वाटत ना मनिं भीती । सांग कशी सोनुले ॥ १ ॥
निजले बघ कोटरांत । चिउकाऊ ते निवांत ॥
झाली बघ मध्य रात । नीज अतां सोनुले ॥ २ ॥
फिरवूं का चांदण्यांत । झुलवूं का पाळण्यांत ॥
निजवूं गाऊनि गीत । सांग तुला सोनुले ॥ ३ ॥
नीज अतां लडिवाळें । पेंगुळले तव डोळे ॥
थांबवि गे हे चाळे । झोंप सुखें सोनुले ॥ ४ ॥

* * *

## ४१ म्हणुन लाजलीस का ?

लाजलीस का अशी । अबोल जाहलीस का?
दाविलेस ना तरी–प्रणय राहिला मुका ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
प्रणयरंग घेउनी–हृत्पटावरी कुणी
चित्र रेखिलें कसें–उमगलें तुला न का ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
कपोल लाल जाहलें–नयनिं हास्य सांठलें
अधर हे पहा तुझे–कंप पावतात का ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
हृदयिं कोण गे वसे–नयनिं बिंब तें दिसे--
लपविण्यास गुपित गोड-करिसि खेळ हा फुका ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
प्रीति-ज्योति तेवुनी–हृदयमंदिरीं कुणी
दिव्य तेज पसरुनी–दिपवि तव मनास का ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
नेत्रबाण फेकुनि–विद्ध काय हो कुणी ?
शिकार पाहुनी मनीं–प्रसन्न जाहलीस का ? ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
कां उरांत धडधडे–कोडें मज उलगडे
दचकलीस कां अशी–क्षणांत हांसलीस का ? ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥
लाविलें कुणी पिसें–सांग जाहलें कसें
मोहवि का कुणि चकोर–चंद्रिके तुलाच का ॥
म्हणुन लाजलीस का ? ॥

* * *

## अभंग

— १ —

तरु वनीं फोंफावला
पक्षिगण धांवत आला ॥
आश्रयासि त्याच्या येती ।
सुखें कोटरीं नांदती ॥
फुलें, फळें वरि आलीं ।
संतोषली विहगावली ॥
हाय ! झंझावात आला ।
तरु धरणिसि पडला ॥
पक्षि पळति चहूं वाटें
माया, मोह जाई कोठें ? ॥

दा. क्र. १००४९

* * *

— २ —

जगताच्या दर्यावरी । नाव फिरे चक्रापरी ॥
सुटे संकटांचा वारा । दर्या उफाळला सारा ॥
माथा उसळती लाटा । चहूंकडे बंद वाटा ॥
पुरे आतां कोंडमारा । सोडवुनी न्यावें घरा ॥

* * *

– ३ –

फाड माझें बा हृदय ।
सांग आंत दिसे काय ?"
जैसें दिसतें बाहेरी ।
तैसें नाहीं कां अंतरीं ? ॥
मन निर्मळ आरसा ।
उजळिला तेजें जैसा ॥
करोनिया शांत मन ।
पहा कसाला लावून ॥

* * *

– ४ –

आतां मनीं एक ओढ । तुझ्या चरणाची जोड ॥
गोड शब्दांचीं सुमनें । द्यावीं मला संतोषानें ॥
तुझ्या मायेची पांखर । पडो माझ्या तनूवर ॥
कृपा–छत्र बापाजिचें । भय मज ना काळाचें ॥

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम
क्रमांक
वि: ..................
नों: दि: ..................

— ५ —

देवा तुझें घर । बहुत सुंदर ॥
शांतीचें मंदिर । मूर्तिमंत ॥
शांतिदेवी जेथें । दुःखाचाही अंत ।
नांदताती तेथ । भाग्यवंत ॥
ऐशा या मंदिरीं । वाटते राहावें ।
घेऊनिया जावें । मज घरीं ॥
जगिं कोलाहालें । मन माझें भ्यालें ।
जिती परि मेले । खरोखरी ॥
सुचत न कांहीं । रुचत न कांहीं ।
शांतीदेवी माई । काय करुं ? ॥
तुझ्या अंकीं शीर । ठेवुनी निजावें ।
आणिक रहावें । संगें तुझ्या ॥
एवढी ही माझी । पुरवावी आस ।
लागलासे ध्यास । निशिदिनीं ॥

* * *

— ६ —

भेटशील जेव्हां मला । सांग काय देऊं तुला ।
रिक्त हस्तें भेटूं कैशी । हीच चिंता अहर्निशीं
कांहीं नाहीं सांठविलें । जिणें सर्व फोल गेलें ॥
पश्चात्ताप होई जिवा । खरें सांगतें केशवा ॥

* * *

– ७ –

न्यावयासी मज येशील बा जेव्हां ।
नाचेन मी तेव्हां । आनंदानें ॥
नाचेन मी तेव्हां बालकाच्यापरी ।
साऱ्या घरभरी । नाचेन मी ॥
सांगेन सकलां पिता माझा आला ।
न्यावया मजला । माहेराशीं ॥
मायेची साऊली पित्याचें तें छत्र ।
म्हणे अपवित्र । कोण मज ॥
वाट पहातसे पाडसाच्या परी ।
धांवोनिया हरी । येई वेगें ॥

* * *

– ८ –

वाट पाहतां शीण भारी ।
मूळ धाडा झडकरी ॥
दूतालागीं न धाडावें ।
आपण यावें सवें न्यावें ॥
आयुष्याच्या मार्गावरी ।
चालतांना शीण भारी ॥
म्हणुनिया करीं धरा ।
झणि न्यावें अपुल्या घरा ॥

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. पुस्तक
अनुक्रम २८०३६ वि: ३१०५
क्रमांक ९८३३ नों: दि: २८।७।५

आतां एकच मागणें । कोणालागीं न सांगणें ॥
गोड शब्दरूपी मेवा । प्रेमें मज पाठवावा ॥
जग म्हणे जरी मोठी । भुकेलेली खाऊसाठीं ॥
तुमच्या मायेची दुशाल । केव्हां धाडुनिया द्याल ॥
दयादृष्टीनें पाहणें । हेंची मज हवें लेणें ॥
तुझ्याविना कोणापाशीं । मागूं याच मागण्याशी ॥

* * *

– १० –

विवेका ! विवेका ! तूं रे माझा भाई । बोलाविते ताई तुजलागी ॥
तुजलागी मी रे मारितसे हांका । काय सांग फुका जातील त्या ।
विवेका ! विवेका ! कर मज जागें । चुकल्याशी रागें भर मज ।
घसरेल पाय सांवरी रे, मला । सांगतसे तुला पुन्हा पुन्हा ॥
द्रौपदीच्या पाठीं उभा जगजेठी । तैसा माझ्या पाठीं उभा राहे ॥

* * *

- ११ -

पुष्प विकसलें वनीं । नाहीं हुंगियलें कोणीं ॥
त्याचा सुवास सुटला । नाहीं रसिक भेटला ॥
जाय फोल आयु साचें । परि जगा काय त्याचें ॥
एके दिनीं तरु-तलीं । दलें त्याचीं विखुरलीं ॥
मातीलागीं मिळे माती । परी कुणा त्याची खंती ॥
ऐशीं जगीं जीव-सुमें । उपेक्षिलीं अज्ञतमें ॥
विकसलीं नष्ट झालीं । आलीं तेथें निघुनी गेलीं ॥
नाहीं दोष हा कोणाचा । ज्याच्या त्याच्या दुर्दैवाचा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २४०३६ वि: काव्य
क्रमांक ९७३३ नों: दि: २४।८।५८
REFBK-0010049
REFBK-0010049
१००४९